रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १११ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘राम कृष्ण हरी’ च्या जयघोषाने जालना शहर दुमदुमले

### वारकरी संत साहित्य संमेलनानिमित्त ग्रंथदिंडी



**जालना । प्रतिनिधी -** वारकरी संत साहित्य संमेलनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीतील ' राम कृष्ण हरी' च्या जयघोषाने शनिवारी ( दि. १३) जालना शहर दुमदुमले.
जेईएस महाविद्यालयात आयोजित वारकरी संत साहित्य संमेलनानिमित्त शनिवारी ( दि. १४) जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळून ग्रंथदिंडी काढण्यात आली. संमेलनाध्यक्ष डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर यांच्या हस्ते या ग्रंथदिंडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. श्रीधर नांदेडकर यांची विशेष उपस्थिती होती. भजनी मंडळ, विविध शाळा व वारकऱ्यांच्या मोठ्या सहभागाने तसेच ' राम कृष्ण हरी' च्या जयघोषाने ही ग्रंथदिंडी लक्षवेधी ठरली. विठ्ठल- रुख्मिणी व वारकऱ्यांच्या वेशभूषेतील शालेय विद्यार्थी या ग्रंथदिंडीचे आकर्षण ठरले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बडी सडक मार्गे ही ग्रंथदिंडी जेईएस महाविद्यालयात विसर्जित झाली. ग्रंथदिंडीत संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने, उपप्राचार्य महेंद्र सदावर्ते, सतीश महाराज बनकर, प्रमोद कुमावत, विष्णु महाराज बारड,पांडुरंग महाराज बोंद्रे, सोनुने गुरूजी, नंदकिशोर डंबाळे, डॉ.एकनाथ शिंदे, डॉ. राजेंद्र सोनवणे, डॉ. हेमंत वर्मा, डॉ.सुजाता देवरे, शाहीर अप्पासाहेब उगले, राजाभाऊ मगर यांच्यासह शिक्षक-प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, वारकरी संत साहित्य संमेलनानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.







**युवा आदर्श**

**निरीक्षण ...**

हरलो जिंकलो तरी
कराया हवे परिक्षण
डाव्या उजव्या बाबी
सूक्ष्मते करेनिरीक्षण
गडबड काही असता
पाऊले उचले तक्षण
वेळीचं उचित तक्रार
व्हावे संविधान रक्षण
विजयी नेते मंडळीचे
सर्वत्र चालते औक्षण
मेहनतीकार्यकर्त्यांचे
कौतुक हो क्षणोक्षण
निकाल अनपेक्षितते
का लागले विलक्षण
तत्पर जायचेमुळाशी
हो सखोल पर्यवेक्षण
निवड प्रक्रिये विषयी
नको खोटे अनवेक्षण
अनेकपर्याय उपलब्ध
स्थिती जरी अ लक्षण
दाद प्रमादा विरोधात
ठोस द्यायचे उत्प्रेक्षण
बागुलबुवासंशयग्रस्त
कशाला करंटे लक्षण
समजूघेई कार्यकर्त्यां
कायकरतो समीक्षण
पुढील वाटचालीस्तव
मार्ग मिळेल सुलक्षण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## हैदराबाद गॅझेट प्रमाणे बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये आरक्षण द्या

### आमदार बबनराव लोणीकर यांची विधानसभेत आग्रही मागणी

**नागपूर । प्रतिनिधी -** हैदराबाद गॅझेटमधील ऐतिहासिक नोंदींच्या आधारे बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गामध्ये आरक्षण देण्यात यावे, अशी ठाम व आग्रही मागणी भाजपचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र विधानसभेत केली. नागपूर येथे संपन्न होत असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आज तारांकित प्रश्नाद्वारे आमदार बबनराव लोणीकर यांनी या महत्त्वाच्या विषयावर सरकारला महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या आधारे बंजारा व धनगर समाजाची भूमिका मांडली. बंजारा व धनगर समाजासाठी विधिमंडळात ठोसपणे आवाज उठवणारे लोणीकर हे पहिले आमदार ठरले असून, त्यांच्या भूमिकेबद्दल धनगर व बंजारा समाजातून समाधान आणि आनंद व्यक्त केला जात आहे.

विधानसभेतील चर्चेदरम्यान आमदार लोणीकर म्हणाले की, हैदराबाद संस्थानाच्या काळातील गॅझेटमध्ये बंजारा व धनगर समाजाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून करण्यात आला आहे. कर्नाटक राज्यात बंजारा समाज अनुसूचित जमाती प्रवर्गात आहे. महाराष्ट्रात मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर अनेकांना ओबीसी प्रमाणपत्र मिळाले आहे त्याच आघाडी बंजारा समाजाला देखील हैदराबाद गॅझेटच्या आधारे अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे तसेच धनगड आणि धनगर हे दोन्ही एकच शब्द असून धनगड ही स्पेलिंग मिस्टेक आहे. परंतु कर्नाटक सह इतर राज्यांमध्ये धनगड ही जात अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे परंतु महाराष्ट्रात मात्र धनगर यांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आलेला नाही त्यामुळे हैदराबाद गॅजेटच्या आधारे महाराष्ट्रातील धनगर समाजाला देखील अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

हैदराबाद गॅझेटच्या ऐतिहासिक कागदपत्रांकडे दुर्लक्ष करून आजपर्यंत या समाजांना अनुसूचित जमातींचे घटनात्मक हक्क मिळालेले नाहीत. हा अन्याय दूर करण्याची नैतिक व घटनात्मक जबाबदारी राज्य सरकारची आहे, शासनाने याबाबत सकारात्मक विचार करून दोन्ही समाज बांधवांना न्याय द्यावा अशी मागणी देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, बंजारा व धनगर समाज आजही शिक्षण, रोजगार, आरोग्य व आर्थिक विकासाच्या बाबतीत अत्यंत मागास अवस्थेत आहे. अनेक कुटुंबे दुर्गम व वंचित भागात राहत असून त्यांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. अनुसूचित




जमाती प्रवर्गामध्ये समावेश झाल्यास या समाजांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल आणि त्यांच्या पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या मागासलेपणावर मात करता येईल.

आमदार लोणीकर यांनी या विषयावर राज्य सरकारने तातडीने अभ्यासपूर्ण भूमिका घेऊन केंद्र सरकारकडे प्रस्ताव पान २ वर

### बंजारा-धनगर समाजाच्या एसटी आरक्षणावर आ. अर्जुन खोतकरांचा सभागृहात सवाल

## या समाजाचा आरक्षणाचा प्रस्ताव तातडीने केंद्राकडे पाठवा ही मागणी लावून धरली

**नागपूर -** हैद्राबाद गॅजेटनुसार बंजारा समाज व धनगर समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जालना जिल्ह्यात लाखोंच्या संख्येने ऐतिहासिक मोर्चे व आंदोलन झाले.

या आंदोलनादरम्यान विजय नायक चव्हाण यांनी सलग ६ दिवसांचे अन्नत्याग आंदोलन, तर दीपक बोऱ्हाडे यांनीही १६ दिवस उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले. या दोन्ही समाजांच्या आंदोलनाच्या काळात, शासनाचा प्रतिनिधी म्हणून सर्वप्रथम घटनास्थळी भेट देणारे आमदार अर्जुन खोतकर होते. आंदोलनकर्ते व शासन यांच्यात दुवा म्हणून जबाबदारीची भूमिका बजावत,

देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, व अजित पवार यांच्याशी सतत संपर्क ठेवून आंदोलनाची बदलती दिशा,समाजातील तीव्र भावना याबाबत वरिष्ठांना वेळोवेळी अवगत करण्यात आले. याची दखल घेत, शासनाच्या उच्चस्तरीय बैठकीत शिष्टमंडळाला वेळ देण्यात आल. ज्यात आमदार अर्जुन खोतकर स्वतः उपस्थित होते, आणि या मागणीवर सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन शासनाने दिले होते.

**सभागृहात थेट, आक्रमक सवाल** हिवाळी अधिवेशन २०२५ च्या प्रश्नोत्तराच्या तासात आमदार अर्जुन खोतकर यांनी सरकारला थेट जाब विचारला लाखोंच्या मोर्चानंतर, अन्नत्याग आंदोलनानंतर आणि शासनाने दिलेल्या आश्वासनानंतर आपल्या स्तरावर नेमकी काय कार्यवाही झाली?काय निर्णय घेतले? समाजाला ठोस उत्तर कधी मिळणार?

**समाजाच्या भावना, शासनाची जबाबदारी** बंजारा व धनगर समाजाचा हा प्रश्न केवळ आरक्षणाचा नाही, तर ऐतिहासिक नोंदी, हैद्राबाद गॅजेट, व सामाजिक




न्यायाशी संबंधित आहे. समाज रस्त्यावर उतरतो, उपोषण करतो, पण शासनाकडून फक्त आश्वासने मिळतात ही पद्धत आता चालणार नाही, त्यांच्या मागणीचा विचार करून तातडीने हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा अशी आग्रही मागणी आमदार खोतकर यांनी सभागृहात लावून धरली. बंजारा व धनगर समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आमदार अर्जुन खोतकर यांची भूमिका स्पष्ट, ठाम व संघर्षशील असून या प्रश्नावर जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत आवाज उठवत राहणार, असे त्यांनी स्पष्ट केले.

## जाहीर आवाहन / खुलासा

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मी असलम महेमुद कुरेशी वय ४५ वर्षे, धंदा व्यापार, रा. मंगळ बाजार, जालना ता. जि. जालना सर्व जनतेला संबोधु इच्छितो की, काही दिवसांपुर्वी एक व्हिडीओ वायरल झाला होता. त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान / सोशल मिडिया मध्ये माझी छवी मलीन करण्याच्या हेतुने काही समाजकंटकांनी एक एआय निर्मित बनावट व खोटा व्हिडीओ वायरल केला होता. व त्या अनुषंगाने संबंधीत पोलीसांनी माझ्या विरोधात गुन्हा दाखल केला होता व सध्या सदरील प्रकरण मा. सत्र न्यायालय जालना येथे प्रलंबीत आहे. या जाहीर आवाहन / खुलाशाव्दारे मी सर्व जनतेला अशी विनंती करतो की, मी जन्मापासुन जालना येथे राहतो. मी आणि माझा परीवार बऱ्याच वर्षापासुन राजकरणाच्या माध्यमातून लोकांची सेवा व सहकार्य करत आहे. व आजही करतात. मी कधीच माझे हिंदु बांधवांची धर्म भावना, दुखावणार नाही, मी बऱ्याच वर्षापासुन सर्व जातीचे लोकांमध्ये राहुन राजकरण व समाजकरण करतो. तरी देखील माझ्याकडुन कळत न कळतपणे माझे हिंदु किंवा इतर समाजाचे बांधवांना कसल्याही प्रकारे त्रास किंवा भावना दुखावले गेले असेल तर या जाहिर आवाहन / खुलासा मार्फत मी मनापासुन दिलगीरी व्यक्त करुन माफी मागतो. व भविष्यात कोणताही अनिष्ट / आक्षेपार्ह घटना घडणार नाही. याची काळजी घेईल. तसेच या आवाहनामार्फत मी संबंधीत पोलीसांना विनंती करतो की, त्यांनी माझी प्रतिमा धुळीस करुन हिंदु भावना भडकवणाऱ्या समाज कंटकाविरुध्द योग्य तो तपास करुन सदरील प्रकरणाची सत्यता जनतेसमोर आणावी हि नम्र विनंती.

**मार्फत**
**ॲड. सय्यद त. माजीद**
**मो. ९३२५४५७८००**

**जाहीर आवाहन/खुलासा देणार**
**स्वाक्षरीत**
**असलम महेमुद कुरेशी**

## संपादकीय पान

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा. यांचा आज स्मृतिदिन. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## हैदराबाद गॅझेट ...

पाठवावा, अशी मागणी केली. यासाठी हैदराबाद गॅझेट, जनगणनेची नोंद, सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करणारी विशेष समिती नेमावी, असेही त्यांनी सुचवले.

या मागणीचे पडसाद विधानसभेबाहेरही उमटले. बंजारा व धनगर समाजातील विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते व समाजबांधवांनी आमदार बबनराव लोणीकर यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आभार मानले. आमच्या न्याय्य मागणीसाठी विधिमंडळात ठाम आवाज उठवण्यात आला आहे, धनगर आणि बंजारा समाजासाठी आवाज उठवणारे विधिमंडळातील आपण पहिले आमदार आहात दोन्ही समाज बांधवांच्या वतीने आपले मनःपूर्वक आभार अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

समाजातील ज्येष्ठ नेते व कार्यकर्त्यांनी लोणीकरांच्या धाडसी भूमिकेचे कौतुक करताना सांगितले की, हा मुद्दा केवळ आरक्षणाचा नसून सामाजिक न्यायाचा आहे. या लढ्याला भविष्यात व्यापक पाठिंबा देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार लोणीकर यांच्या या मागणीमुळे राज्याच्या राजकारणात आणि सामाजिक वर्तुळात नव्याने चर्चा सुरू झाली असून, राज्य सरकार या विषयावर पुढे काय निर्णय घेते याकडे बंजारा व धनगर समाजासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा या न्याय मागणीसाठी श्री सुधाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या अहवालानंतर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे तसेच बंजारा समाजाच्या न्याय हक्क मागण्यासाठी हैदराबाद गॅझेट प्रमाणे अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून तीन महिन्यात समितीने या संदर्भातील अहवाल सादर करावा व त्यानंतरची कार्यवाही आदिवासी विकास विभागाच्या वतीने करण्यात येईल असेही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

# ऐतिहासिक दस्तऐवजांवर आधारित बंजारा-धनगर समाजाच्या न्याय्य मागणीवर विधानसभेत चर्चा

नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात मी एक अत्यंत संवेदनशील, ऐतिहासिक आणि सामाजिक न्यायाशी निगडित विषय ठामपणे मांडला. हैदराबाद संस्थानाच्या गॅझेटमधील ऐतिहासिक नोंदींच्या आधारे बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गामध्ये आरक्षण देण्यात यावे, ही माझी स्पष्ट आणि आग्रही मागणी मी विधानसभेत मांडली.

हैदराबाद संस्थानाच्या काळातील गॅझेटमध्ये बंजारा व धनगर समाजाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून झालेला आहे. हे केवळ मत नाही, तर ऐतिहासिक दस्तऐवजांवर आधारित वास्तव आहे. कर्नाटक राज्यात बंजारा समाज आधीपासूनच अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट आहे. महाराष्ट्रात हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर अनेक समाजांना, विशेषतः मराठा समाजातील अनेक घटकांना ओबीसी प्रमाणपत्रे मिळाली आहेत. मग त्याच न्यायाने, त्याच ऐतिहासिक आधारावर बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट का केले जाऊ नये? हा प्रश्न मी शासनाला ठामपणे विचारला.

त्याचप्रमाणे धनगर समाजाबाबतही मी स्पष्ट भूमिका मांडली. 'धनगड' आणि 'धनगर' हे दोन वेगवेगळे समाज नसून, हा केवळ नावातील (स्पेलिंगमधील) फरक आहे. कर्नाटकसह इतर काही राज्यांमध्ये 'धनगड' समाजाचा समावेश अनुसूचित जमाती प्रवर्गात करण्यात आलेला आहे. मात्र महाराष्ट्रात केवळ नावातील फरक दाखवून धनगर समाजाला या घटनात्मक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे. हैदराबाद गॅझेटच्या आधारे महाराष्ट्रातील धनगर समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात यावे, ही माझी ठाम मागणी आहे.

आजपर्यंत हैदराबाद गॅझेटसारख्या ऐतिहासिक कागदपत्रांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे बंजारा व धनगर समाजाला त्यांच्या घटनात्मक हक्कांपासून वंचित राहावे लागले. हा केवळ प्रशासकीय प्रश्न नाही, तर हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. हा अन्याय दूर करण्याची नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी राज्य सरकारची आहे, असे मी स्पष्ट शब्दांत सभागृहात मांडले.

मी सभागृहात हेही नमूद केले की, बंजारा व धनगर समाज आजही शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अत्यंत मागास अवस्थेत आहे. अनेक कुटुंबे दुर्गम आणि वंचित भागात वास्तव्यास असून त्यांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागतो. अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश झाल्यास या समाजांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळेल आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या मागासलेपणावर मात करता येईल.

या विषयावर राज्य सरकारने केवळ राजकीय नव्हे तर अभ्यासपूर्ण आणि संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी माझी ठाम भूमिका आहे. हैदराबाद गॅझेट, जनगणनेच्या नोंदी, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, तसेच न्यायालयीन निर्णयांचा सखोल अभ्यास करून केंद्र सरकारकडे ठोस प्रस्ताव पाठवण्यात यावा, अशी मागणी मी केली आहे.

माझ्या या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री मा. संजय शिरसाठ यांनी सभागृहात महत्त्वाची माहिती दिली. धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील समावेशासाठी सुधाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच बंजारा समाजाच्या न्याय्य मागणीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असून, तीन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्यात येईल आणि त्यानंतर आदिवासी विकास विभागामार्फत पुढील कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.



या संपूर्ण प्रक्रियेत शासन सकारात्मक पावले टाकत असल्याचे चित्र आहे, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. मात्र केवळ समित्यांपुरते मर्यादित न राहता, अंतिमतः बंजारा व धनगर समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे.

आज विधानसभेबाहेर बंजारा व धनगर समाजातील विविध संघटना, समाजबांधव, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी मला दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आभार मानले. आमच्या न्याय्य मागणीसाठी विधिमंडळात ठाम आवाज उठवणारे आपण पहिले आमदार आहात, असे शब्द अनेक समाजबांधवांनी बोलून दाखवले. हे शब्द माझ्यासाठी सन्मानाचे आणि जबाबदारीचे आहेत.

हा लढा केवळ आरक्षणाचा नाही, तर सामाजिक न्यायाचा आहे. जोपर्यंत बंजारा व धनगर समाजाला त्यांचे घटनात्मक हक्क मिळत नाहीत, तोपर्यंत मी हा विषय सोडणार नाही. विधिमंडळात, शासनदरबारी आणि समाजाच्या पातळीवर हा आवाज अधिक बुलंद करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

**आमदार बबनराव लोणीकर**
**(परतूर - मंठा विधानसभा मतदार संघ)**

### देशाच्या राजधानीत 'सनातन राष्ट्रा'चा भव्य शंखनाद !

# आतंकवाद्यांना उत्तर देण्यासाठी घरोघरी छत्रपती शिवाजी महाराज जन्माला येतील ! - कपिल मिश्रा





**नवी दिल्ली । प्रतिनिधी** - पूर्वी जिहादी आतंकवादी वाट्टेल तिथे स्फोट करायचे, आता ते स्फोट करण्याआधी त्यांना चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. मोठ्या संख्येने आतंकवादी मारले जात आहेत. त्यामुळे सेक्युलवाद्यांच्या पोटात दुखत आहे. आता ती पोटदुखी पुढे आणखीन मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यांनी दिल्लीत स्फोट करून लोकांमध्ये भय निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला, तरी आमच्यात भय निर्माण होणार नाही. उलट तुम्ही जेवढे जिहादी आतंकवादी निर्माण कराल, तेवढे छत्रपती शिवाजी महाराज घरोघरी निर्माण होतील, असा स्पष्ट इशारा दिल्लीचे सांस्कृतिक कार्यमंत्री कपिल मिश्रा यांनी दिला.

ते देशाची राजधानी दिल्ली येथील 'भारत मंडपम्' येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. महोत्सवाच्या प्रारंभी रामनामाचा सामूहिक जप करण्यात आला. शंखनाद आणि वेदमंत्र पठण झाल्यानंतर प.पू. शांतिगिरी महाराज, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारीणी श्रीसत्शक्ति(सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन'चे अध्यक्ष आणि भारताचे माजी माहिती आयुक्त उदय माहूरकर, सुदर्शन न्यूजचे प्रधान संपादक श्री. सुरेश चव्हाणके, हिंदु जनजागृति समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. कपिल मिश्रा पुढे म्हणाले की, पूर्वीच्या सरकारच्या काळात राष्ट्राच्या खऱ्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सरकारचा विरोध असायचा, तसेच त्यावर चर्चा कुठे करायची, असा प्रश्न निर्माण व्हायचा; मात्र आज होत असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'ला केंद्र आणि राज्य सरकार अशा दोघांचेही समर्थन आहे. यापुढील काळात धर्म आणि संस्कृती यांचे रक्षण व उत्थान यांच्यासाठी सतत कार्यरत रहाण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा.

या वेळी प्रारंभी 'वंदे मातरम्' राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सर्व उपस्थितांनी 'वंदे मातरम्'चे सामूहिक गायन करून राष्ट्रीत्वाची भावना जागृत केली. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचेही सहकार्य या कार्यक्रमाला लाभले. उद्घाटनप्रसंगी हजारो वर्षापूर्वीच्या श्री सोरटी सोमनाथाच्या ज्योतीर्लिंगाचे दिव्यांशाचे सर्वांना दर्शन घडवण्यात आले. या वेळी त्याचे संतांच्या हस्ते पूजन करून त्याचे माहात्म सांगण्यात आले. उद्घाटन समारंभात सनातन संस्था निर्मित 'संकल्प रामराज्य का' या हिंदी ग्रंथाचे, तर संरक्षण मंत्रालयाचे अपर सचिव श्री. वेदवीर आर्य लिखित 'क्रॉनोलॉजी ऑफ ओरिजिन्स ऑफ इन्डो युरोपियन सिविलाइजेशन' या इंग्रजी पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

**भारत 'विकृती सामृगी मुक्त' देश व्हावा, असे ध्येय ठेवूया ! - उदय माहुरकर**

आज 'ओटीटी', सामाजिक माध्यमे आदींच्या माध्यमांतून अश्लिलतेचा प्रचार केला जात आहे. हिंदवी स्वराज्याप्रमाणे हिंदु राष्ट्र स्थापन करण्यासाठी देशातील शिक्षा पद्धती कठोर होणे आवश्यक आहे. भारत 'विकृती सामृगी मुक्त' देश व्हावा, असा संकल्प देशवासियांनी घ्यायला हवा, असे आवाहन श्री. उदय माहूरकर यांनी केले.

**दहशतवाद्यांना उत्तर देण्यासाठी अडीच आघाड्यांवर लढणे आवश्यक ! - अभय वर्तक**

या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले की, आज देशात एकही जिल्हा व राज्य असे नाही की, जेथे आतंकवाद्यांचे स्लीपर सेल नाहीत. दोन आघाड्यांवर सेना आणि सरकार लढत आहे. अर्ध्या आघाडीवर जनतेला लढायचे आहे. तरच या आतंकवाद्यांना पायबंद बसणार आहे. यासाठी देशाच्या राजधानीत, कुरूक्षेत्राजवळ 'सनातन राष्ट्रा'चा शंखनाद करत आहोत.

हा महोत्सव डरपरींरपठीहींरडहरपज्ञहपरव. ळप या संकेतस्थळावर लाइव्ह पहावा, तसेच भारत मंडपम्च्या प्रांगणातील हॉल क्र. १२ मध्ये लावण्यात आलेल्या ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन पहायला सर्वांनी अवश्य यावे, असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथील विद्यार्थी वैभव रायमल याची एअर फोर्स पदी निवड



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथील विद्यार्थी वैभव शाम रायमल याची इंडियन एअर फोर्स पदी निवड झाली आहे. टेंभुर्णी येथील जिजाऊ विद्यालय येथे या वेळी शाळेच्या सर्व स्टॉप कडून स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आली.या वेळी सगळे शिक्षक शिक्षिका पालक वर्ग विद्यार्थी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल येथे त्याचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी शाळेच्या अध्यक्षा डॉ. सौ. सुरेखा संजय लहाने व जिजाऊ मित्र मंडळ जाफ्राबाद चे अध्यक्ष संजय लहाने यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# स्ट्राँग रुम फोडली!

**रायगड** : येत्या २१ डिसेंबरला नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांची मतमोजणी पार पडणार आहे. पण त्याआधीच सुरक्षा रक्षक आणि उमेदवारांच्या पहाऱ्यात असलेली स्ट्राँग रुम फोडल्याचा प्रकार, रायगडच्या पेणमध्ये समोर आला. पण ही स्ट्राँग रुम (झशप एतच् डीींपस ठो) कोणी माणसाने नाही तर चक्क उंदरांनी फोडलीय. हा सर्व प्रकार स्ट्राँग रुममध्ये लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला. रायगडमधील पेणच्या ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्राँग रुममध्ये उंदरांचा सुळसुळाट असल्याचं समोर आलं. शनिवारी पहाटेच्या सुमारास स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम मशिन ज्या कपाटावर ठेवल्या आहेत त्या लाकडी कपाटाचा दरवाजा उघडल्याने एकच गोंधळ उडाला होता. मात्र सीसीटीव्ही फुटेजमध्ये उंदरांचा हा प्रताप उघडकीस आला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. राज्यातल्या बहुतांश भागात ईव्हीएम स्ट्राँग रुमबाहेर विविध पक्षाच्या उमेदवारांसह कार्यकर्त्यांकडून कडक पहारा दिला जात असल्याचं चित्र आहे. मात्र, अकोल्यात वेगळं चित्र पाहायला मिळातंय. अकोल्यातल्या चार नगरपालिका आणि एका नगरपंचायत अशा पाचही ठिकाणी ईव्हीएम स्ट्राँग रुमबाहेर २४ तास कडक पोलिसांचा बंदोबस्त तैनात आहे. अकोल्याच्या तापमानाचा पारा दहा अंशांच्या आसपास पोचला आहे.

# वारकरी संप्रदायाने जनसामान्यांना प्रतिष्ठा दिली

## वारकरी संत साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर यांचे प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी -** जनसामान्यांना प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या वारकरी संप्रदायाचे संस्कार प्रत्येकाच्या मनात रुजण्याची गरज द्वाराचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर यांनी आज( दि. १३) येथे प्रतिपादित केली.

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या अनुदानातून जालना एज्युकेशन सोसायटीतर्फे जेईएस महाविद्यालयात आयोजित वारकरी संत साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. आळंदी देवाची येथील हभप डॉ. नारायण महाराज जाधव यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे या साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. दासू वैद्य, प्रा. श्रीधर नांदेडकर, जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरूषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड,स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, आळंदी देवाची येथील हभप ड. यशोधन महाराज साखरे , हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर, प्रा. सतीश बडवे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिति होती.

यावेळी बोलतांना डॉ. लहवितकर पुढे म्हणाले की , महाराष्ट्रच नव्हे तर अखंड भारत देशाच्या सांस्कृतिक, वैचारिक जडणघडणीत वारकरी संप्रदायाची भुमिका मोलाची ठरली आहे. याच वारकरी संप्रदायाने जनसामान्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. संतवाणी ही देववाणी आहे. संत साहित्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. जगद्गुरु तुकोबारांयांच्या गाथेमुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, हे नाकारता येणार नाही.

आज भारतीय समाज जातीपातींच्या विषमतेत दुभंगतो आहे. भौतिक साधने शारीरिक व मानसिक अपंगत्व आणू पाहात आहेत, अनाचार, दंभाचार, भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि नकारात्मक मनोवृत्तीच्या आहारी समाज जात आहे.

या परिस्थितीतही वारीला येणाऱ्या समाजात होणारी वाढ, ही लोकांना यातून बाहेर पडण्याची आस आहे. हा विश्वास सार्थ करण्याचे आव्हान कीर्तनकारांना पेलायचे आहे. कीर्तनकारांपुढे प्रसन्नमनस्क समाजनिर्मितीचे आव्हान आहे. कीर्तनकाराचा व्यासंग व्यापक, सखोल आणि नेमका असावा. तो निर्भीड, निर्भय आणि धैर्यवान असावा. वारकरी कीर्तनकाराला अगोदर आपल्या राष्ट्रीयत्वाचे स्पष्ट भान असले पाहिजे, तरच त्याची विश्वात्मक भूमिका सार्थ ठरेल. कुटुंबवत्सलता, ग्रामएकात्मता, समाजशीलता आणि राष्ट्रीय एकात्मभावना कर्तव्यतत्परतेने जपत विश्वात्मक भूमिका अनुसरावी. प्रत्येकाच्या मनात वारकरी संस्कार रुजण्याची गरज विषद करून राज्य शासनाने धुळखात पडलेल्या संतपिठाकडे लक्ष द्यावे, संततीर्थासाठी पुढाकार घ्यावा, तसेच संत साहित्य हे जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

दृकश्राव्य प्रणालीद्वारे संमेलनाचे उद्घाटन करतांना हभप डॉ. नारायण महाराज जाधव यांनी संत विचार हे जगाला प्रेरक असल्याचे सांगून संत साहित्याचा प्रसार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. संताचे विचार हे प्रत्येकाच्या हृदयात रूजावेत, असे सांगून अध्यात्मामुळे समाज जीवन ढवळून निघावे,अशी अपेक्षा व्यक्त केली.



यावेळी बोलताना प्रा. दासू वैद्य यांनी संत साहित्य विचार हा जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी अलिकडे प्रयत्न केले जात असल्याचे सांगत वारकरी संप्रदाय व संत विचार हा मानवतेची शिकवण देणारा असल्याचे सांगितले. स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी बोलतांना जालना शहरात आयोजित हे वारकरी संत साहित्य संमेलन म्हणजे आधुनिक विज्ञान व अध्यात्माचा संगम असल्याचे सांगितले. संताचे विचार समाजमनात पेलण्यासाठी हे वारकरी संत साहित्य संमेलन पोषक ठरेल, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक करतांना संमेलनाचे कार्यवाह डॉ .यशवंत सोनुने यांनी वारकरी संत साहित्य संमेलनाच्या आयोजनाविषयी विस्तृत माहिती दिली.

संमेलनाध्यक्ष डॉ रामकृष्ण महाराज लहवितकर यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलित करून तसेच शंखनादाने या वारकरी संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन विनोद जैतमहल यांनी तर डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी किशोर महाराज तिवारी, बाबूराव व्यवहारे, प्रा. बसवराज कोरे, डॉ. रावसाहेब ढवळे, कॉ. अण्णा सावंत, शाहीर अप्पासाहेब उगले, ड. सोपान भांदरगे,डॉ.पद्मजा जाधव, विनीत सहानी डॉ. प्रभाकर शेळके, राजेंद्र वांजळे, सुलभा कुलकर्णी, मनीषा भोसले यांच्यासह वारकरी संत साहित्य संमेलनाचे पदाधिकारी, वारकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

# प्रवीण तोगडिया यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** आंतरराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रवीणभाई तोगडियाजी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

या कार्यक्रमासाठी आंतराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंगदलाचे संघटन मंत्री श्री विकासजी रेंगे गोवा/ महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रीय मंत्री किशोरजी डिकोडियार देवगिरी प्रातं उपाध्यक्ष श्री अविनाश देशमाने जालना जिल्हा संपर्क मंत्री जगन्नाथ शिंदे यांची उपस्तीथी होती.

या मध्ये विलास धनवाई, सचिन काळे, प्रकाश इंगळे, शाम आवटी, भागाजी सोनसाळे, अनिल भाले, ज्ञानेश्वर ढवळे, पवन उखर्डे, अनिकेत उखर्डे, दादाराव देशमुख, योगेश गडकर, राजु केवट, सागर इंगळे, संतोष उगले, कैलास जाधव, राहुल शेडुदे, कृष्णा आहेर, उमेश गावंडे, अनिकेत जमधडे, सूर्यभान मतकर, मंगेश वाणी, सदाशिव म्हस्के, विनोद इंगळे, अविनाश देशमाने

आदि ३१ रक्त दात्यानी रक्तदान केले.

कार्यक्रमासाठी शैलेश डोमळे, भारत बोराडे, सागर इंगळे, श्रीकांत उखर्डे, अक्षय गावंडे, कृष्णा आहेर, राजु भागवत, अनिकेत जमधडे, विष्णु उखर्डे, आकाश बोराडे, पवन उखर्डे, अनिकेत उखर्डे, शेखर आहेर, आदि कार्यकर्ते उपस्तिथ होते.

---

# लोक अदालतीमध्ये ४५८ नळ कनेक्शनचे नियमितीकरण, ३४,३५,००० रुपये वसुल

**जालना । प्रतिनिधी -** लोक अदालतीमध्ये ४५८ नळ कनेक्शनचे नियमितीकरण, ३४,३५,००० रुपये वसुल करण्यात आले आहे. यापुढे मुदतीत (दिनांक २०.१२.२०२५) जे अनधिकृत नळ धारक तडजोडीसाठी येणार नाहीत त्यांच्या मालमत्तेवर रु. १०,००० चा बोजा टाकण्यात येईल व तदनंतर अनाधिकृत नळ धारकांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येवुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शनिवार (दि १३) रोजी जालना जिल्हा व सत्र न्यायालय येथे चौथ्या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये जालना शहर महानगरपालिकेतर्फे शहरातील अनधिकृत नळ धारकांची प्रकरने तडजोडी करिता सादर करण्यात आली होती. या दरम्यान एकूण ४५८ अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यात आली आहेत. त्याद्वारे महानगरपालिकेने रु. ३४,३५,०००/- इतक्या रकमेची वसुली केली आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीचे व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे उद्घाटन माननीय उच्च न्यायालयाचे पालक न्यायाधीश श्री. अरुण पेडणेकर साहेब यांच्या हस्ते पार पडले.

याप्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना श्रीमती व्ही. एम. मोहिते मॅडम, पॅनल प्रमुख श्री. के. आय. खान साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर तथा मुख्य न्याय दंडाधिकारी जालना, पॅनल प्रमुख श्रीमती आर.एन. मुजावर मॅडम, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर जालना, पॅनल प्रमुख श्रीमती व्ही. एम. कदम, ७ वे दिवाणी न्यायाधीश, क. न्याय दंडाधिकारी जालना, स्तर तथा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पॅनल सदस्य बी. बी. डाके, श्री. एडवोकेट सी. एस. सिंग, एडवोकेट श्री. पी. एल. वरपे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम, उपायुक्त श्रीमती नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त श्रीमती अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त श्री. केशव कानपुडे, अभियंता श्री. राजेश बगळे, लिपिक श्री ऋषिकेश शेडुते, पाणी वितरण प्रमुख नवीन जालना श्री. राजू मोरे, पाणी वितरण प्रमुख जुना जालना श्री. ज्ञानेश्वर ढगे, साई एजन्सीचे संचालक श्री. किरण जगताप त्यांचे सहयोगी श्री. प्रवीण खवले, श्री मयूर गोरे, श्री गणेश सोळुंके, श्री योगेश सोळुंके, एडवोकेट संग्राम तारडे व एजन्सीचे इतर प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.

---

# महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज वितरणास इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी, जालना महानगरतर्फे आगामी जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज विक्री करण्याची प्रक्रिया आज दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा भाजपा जिल्हा कार्यालयात सुरू करण्यात आली. अर्ज वितरणाच्या पहिल्याच दिवशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आज पहिल्याच दिवशी एकूण ३०७ इच्छुक उमेदवारी फॉर्म चे वाटप करण्यात आले. या प्रसंगी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्यासह राजेशजी राऊत, अशोक पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगी देशपांडे, अरुणा जाधव इत्यादी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

या वेळी जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी सांगितले की, जालना महानगरपालिकेची आगामी निवडणूक असून भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी उत्साहाने सहभागी होत आहे. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देणारे सक्षम उमेदवार देण्याचा भाजपा महानगराचा संकल्प आहे. अर्ज वितरणास मिळालेला आजचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता पक्ष संघटनेची भक्कम ताकद आणि जनतेचा भाजपावरील विश्वास अधिक दृढ असल्याचे दिसून येते. जालना शहराचा विकास हा भाजपाचा केंद्रबिंदू मानून शहराच्या पुढील पाच वर्षांच्या विकासाचा अजेंडा तयार करून जालना महानगरपालिकेतील जनतेच्या दैनंदिन समस्या वीज, पाणी, स्वच्छता व सुंदर रस्ते याला प्राधान्य देणारी असेल व हे मुद्दे घेऊन आम्ही जनतेसमोर जाणार असून जनता निश्चितच या मुद्द्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या पाठीसी उभी राहून जालना महानगरपालिकेत भाजपा चे मोठ्या संख्येने उमेदवार निवडून देतील असा मला पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

---

# मंठा कृषी कार्यालयात भ्रष्टाचाराचे जाळे उघड

## संभाजी ब्रिगेडकडून उपकृषी अधिकाऱ्यावर गंभीर आरोप, चौकशीची मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा मंडळ क्र. १ - सज्जा क्र. २ येथील उपकृषी अधिकाऱ्यांच्या गंभीर अनियमितता, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांची आर्थिक लूट, पाहण्यांमध्ये जाणूनबुजून होणारा विलंब आणि शासकीय नियमभंग यांच्या तक्रारींचा धबाधबा सुरू असून या संदर्भात आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने मा. तालुका कृषी अधिकाऱ्यांना औपचारिक निवेदन देण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी दिलेल्या निवेदनात संबंधित उपकृषी अधिकाऱ्यांविरुद्ध धक्कादायक आरोप करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या औजार/यंत्रसामग्री पाहणीदरम्यान अवैध पैशाची मागणी केल्याच्या अनेक तक्रारी त्यांच्या कडे प्राप्त झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. शेतकरी भीतीपोटी कृषी कार्यालयाकडे तक्रार न करता आमच्याकडे गोपनीय तक्रारी करत आहेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

नियमाप्रमाणे लाभार्थ्याची पूर्वसंमती अपलोड झाल्यानंतर ८ दिवसात पाहणी करणे बंधनकारक आहे. परंतु संबंधित अधिकारी १५ दिवस ते एक महिना किंवा त्याहूनही अधिक विलंब करत असल्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान उशिरा मिळत आहे आणि आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

त्याहूनही गंभीर बाब म्हणजे काही प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष ठिकाणी अवजारे नसतानाही पाहणी पूर्ण दाखवून अनुदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व पाहण्यांची स्वतंत्र चौकशी समितीद्वारे पुन्हा प्रत्यक्ष पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच फळलागवड, बांबू



लागवड आणि इतर योजनांमध्येही गंभीर अनियमितता असल्याचे निवेदनात सांगण्यात आले आहे. काही शेतकऱ्यांकडे फळ लागण्याची वेळ संपूनही पाहणी न झाल्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले असल्याचे नमूद करण्यात आले.

याशिवाय, मागील संपूर्ण वर्षभरात फक्त एकच मस्टर काढल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी केल्याचेही संभाजी ब्रिगेडने सांगितले.

संबंधित अधिकारी तालुक्याच्या मुख्य ठिकाणी न राहता जिल्ह्यात वास्तव्यास असल्यामुळे ८-१० दिवसांतून एकदाच कार्यालयात किंवा कार्यक्षेत्रात येतात, ज्यामुळे शेतकऱ्यांची कामे प्रलंबित राहत आहेत, असा आरोपही करण्यात आला आहे.

संभाजी ब्रिगेडने उपकृषी अधिकाऱ्यांवर कठोर विभागीय आणि कायदेशीर कारवाई, सर्व पाहण्यांची पुनर्पडताळणी, लागवड योजनांची स्वतंत्र चौकशी, अवैध पैशाची मागणी करणाऱ्यांवर कारवाई आणि शेतकऱ्यांचे काम वेळेत न केल्याबद्दल जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ शिस्तभंग कारवाईची मागणी केली आहे. संभाजी ब्रिगेडने इशारा दिला आहे की, येत्या आठ दिवसांत चौकशी न झाल्यास कृषी कार्यालयासमोर तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल आणि याची संपूर्ण जबाबदारी कृषी विभागावर राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले.

---

# परतूरच्या शास्त्री विद्यालयात ४५७ विद्यार्थ्यांनी दिली 'नवोदय' प्रवेश परीक्षा




**परतूर । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शनिवारी दि. १३/१२/२०२५, रोजी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडली.या केंद्रावर एकूण ४८० विद्यार्थ्यांपैकी ४५७ विद्यार्थी परिक्षेला उपस्थित होते तर २३ विद्यार्थी गैरहजर होते अशी माहिती केंद्र संचालक, बिरादार यांनी दिली.दरम्यान, केंद्रावर कुठलाही अनुचित प्रकार घडला नसल्याचेही बिरादार यांनी सांगितले.

परीक्षेच्या यशस्वीतेसाठी केंद्र स्तरीय निरीक्षक राम सोळंके, शंकर थोटे, संदीप वाघमारे, संतोष साळवे यांनी साहाय्य केले.

तहसीलदार दामोदर जाधव यांनी केंद्राला भेट दिली तसेच आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक तारे, डॉ. पायल माने, फार्मासिस्ट विजय बकाल, शिवकांता कळणे यांचे पथकही केंद्रावर हजर होते तर महसूल विभागाचे मंडळ अधिकारी विश्वनाथ भोरे, ग्राम महसूल अधिकारी पी. डी. देशमुख, युवराज तुपसुंदर,कृष्णा सोनवणे, सतीश निलेवाड केंद्रावर उपस्थित होते. पोलीस कर्मचारी तिबुले यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.




बदनापूर शिवसेना जनसंपर्क कार्यालयात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंढे यांची जयंती साजरी

# स्व. गोपीनाथ मुंढे यांचे कार्य कायम स्मरणात राहील - भाऊसाहेब घुगे

**बदनापूर । प्रतिनिधी -** लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्या सामाजिक कार्याने समाजातच नव्हे तर सामाजिक, राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांच्या कायम स्म रणात राहील असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे आयोजित लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात केले .या वेळी त्यांनी सांगितले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्याशी माझा जवळचा संबंध आला असून ते जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक विकासात्म क विषयावर माझ्यासोबत चर्चा करत होते पुन्हा मुंडे साहेबांसारखे नेते होने नाही असे घुगे यांनी सांगीतले यावेळी भोकरदन शिवसेना तालुकाप्रम ुख नानासाहेब वानखेडे यांनी यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंढे यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले तसेच यावेळी केंद्रीय म ाजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधनाने शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .यावेळी या कार्यक्रमात प्रवीण फुके, म हादू गीते, ईश्वर झुंबड, भगवान मदन, हरिभाऊ कापसे, कैलास दुधानी, रामेश्वर नागवे, रमेश चोरमारे, साईनाथ लहाने,राजू वायाळ, छायाताई जराड,राम ेश्वर नागवे ,मनोज शिंदे, दीपक दिघे, विलास खैरे, पत्रकार संजय भुजाळ, नारायण बामणे, विलास खैरे, नंदू दाभाडे गणेश शिंदे अनिल जावळे ,दीपक मिसाळ ,करण बनस्वाल, दिनकर बारगाजे, अनिल देशमुख, मनीष काळे ,अशोक मगरे ,प्रल्हाद भडांगे,कैलास शिंगारे ,विलास पेरकर ,शिवाजी कदम ,विठ्ठल खरात ,नंदू अंभोरे कविता जावळे, ईश्वर कवडे, केदार गीते, सखाराम शिरसागर आदींची उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल दाभाडे, कैलास वैद्य ,जालिंदर शेरे, राहुल आघाव, सिद्धेश्वर बनकर, बाळासाहेब वाघ, रामेश्वर मोहिते यांनी प्रयत्न केले.




## जय बजरंग फाउंडेशनच्यावतीने लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** नूतन वसाहत लहुजी नगर येथे स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी बजरंग फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी जय बजरंग फाउंडेशन चे जिल्हाध्यक्ष उमेश कुटे, शिवसेनाप्रमुख भाऊसाहेब घुगे, काँग्रेस कमिटी सदस्य सचिन घोडे, अश्विन ससाने, दावीद दादा गायकवाड, बाबू भोसले, श्याम सराटे, विशाल कांबळे, राम घोगरे, माऊली कळम कर, संजू गुढे, संजय सराटे, रमेश पवार,व जय बजरंग फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## सीए आकाश मुंदडा यांना पी.एच.डी. प्रदान

**जालना -** येथील चार्टर्ड अकाउंटंट आकाश मुंदडा यांना साबरम ती विद्यापीठाची पीएचडी डिग्री ने सन्मानित करण्यात आले आहे. आकाश मुंदडा रिस्क अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट या विषयात प्रबंध (थिसीस) सादर केला होता. यात आपली संपत्ती सात पिढ्यापर्यंत कायदेशीर कशी टिकवता व वाढवता येईल याबद्दल जवळपास २०० पानाचे विवेचन सादर केलेले आहे. हा रिसर्च गुजरात येथील साबरमती विद्यापीठाने मान्य करत आकाश यांना पीएचडी डिग्री प्रदान केली आहे. आकाश मुंदडा यांनी याआधी एल.एल.बी. आणि सी.ए. डिग्री घेतलेली असून फॉरेन्सिक ऑडिट फ्रोड डिटेक्शन आणि सर्टिफाइड कॉन्करंट ऑडिटर तथा डीसा (ऊखड) या पदव्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट नई दिल्ली येथून संपादन केलेल्या आहेत. हे जालन्याचे वरिष्ठ सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# लोकनेते माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त भाजपा जालना महानगरतर्फे अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** लोकनेते माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती भारतीय जनता पार्टी जालना महानगर च्या वतीने स्व.मुंडे चौक व भारतीय जनता पार्टी कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, राजेशजी राऊत, अशोक अण्णा पांगारकर, विजय कामड, विमलताई आगलावे, शुभांगीताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.





याप्रसंगी धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, अमोल धानुरे, वैशाली बनसोडे, देविदास देशमुख, राजेश जोशी, अमोल कारंजेकर, प्रा.कपिल दहेकर, सुभाष सले, अरुणा जाधव, सोमेश काबलीये, अशोक पवार, कल्याण भदणेकर, बाबासाहेब कोलते, रोहित नलावडे, अमन मित्तल, इम्रान सय्यद, शाम उगले, शंकर वायाळ, बद्री जांगडे तसेच अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



**जिल्हाअधीकारी अमिषा मित्तल यांचा सत्कार करताना प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र जोगड, सोबत भारतीय जैन संस्था चे अध्यक्ष हस्तीमल बंब, व्यापारी महासंघ अध्यक्ष शहर सतीश पंच, मनोज बंब, वैशाली बंब, आनंद बंब, रुपाली बंब.**

# जिल्हा परिषद शाळेत कवायत संचालनाचा सराव

**मंठा । प्रतिनिधी -** पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला व प्राथमिक शाळा पाटोदा येथे प्रजासत्ताक दिनाच्या तयारीची जोरदार सुरुवात झाली आहे. आगामी प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या कवायत व संचलनाचा सराव उत्साहात घेण्यात येत आहे. या सरावामध्ये प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे, पुंडलिक यमुलवाड, मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, गंगाधर वानोळे यांच्यासह सर्व शिक्षक मनापासून योगदान देत आहेत. विद्यार्थी शिस्तबद्ध चाल, वळण, ताळमेळ आणि संचलनाची तंत्रे आत्मसात करत असून शाळा परिसरात देशभक्तीचे वातावरण अनुभवायला मिळत आहे.शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रजासत्ताक दिनी उत्कृष्ट संचलन सादर करण्यासाठी उत्सुक असून सरावाला शाळा प्रशासन व पालकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.